**ठळक बातम्या**

- नागपूर हिंसाचारात पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही /शांतता राखण्याचं सर्वांना आवाहन

- राज्यात बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींना स्थानबद्ध करण्यासाठी राज्य सरकार येत्या तीन महिन्यात एक केंद्र निर्माण करणार

- विधानपरिषद पोटनिवडणुकीत अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरल्यानं पाचही उमेदवारांची निवड बिनविरोध होणार

- विद्यमान कायद्यांच्या आधारे मतदार ओळखपत्रं आधार कार्डाशी जोडण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजार १३१ अंकांची वाढ नोंदवत पुन्हा ७५ हजाराच्या पातळीवर

**<><><><><>**

नागपुरात काल झालेला हिंसाचार पूर्वनियोजित असल्याचं प्रथमदर्शनी दिसत असून पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करू, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिला. काल रात्री नागपुरात झालेल्या हिंसाचाराबद्दल मुख्यमंत्र्यांनी आज सभागृहात निवेदन दिलं. सर्व समुदायांचे सण-उत्सव सध्या सुरू आहेत आणि अशा वेळी सर्वांनीच एकमेकांप्रति आदरभाव राखावा, शांतता राखावी, असं आवाहनही त्यांनी केलं.

या हिंसाचार प्रकरणी एकंदर पाच गुन्हे दाखल झाले असून नागपुरातल्या ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू केली आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या

पाच तुकड्या तैनात केल्या आहेत, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. कुणालाही कायदा आणि सुव्यवस्था हातात घेऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली....

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नागपूरच्या घटनेबाबत विधान परिषदेत निवेदन दिलं. गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाचं उदात्तीकरण राज्यात सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला. त्याची कबर हटवण्यासाठी नागपूरमध्ये आंदोलन झालं, त्याला उत्तर आंदोलनानं द्यायला हवं होतं, मात्र तिथं पूर्वनियोजित कट करून विशिष्ट समुदायांना लक्ष्य केलं गेलं, असा दावाही शिंदे यांनी केला.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याप्रकरणी सरकारवर टीका केली....

**होल्ड - बाईट - उद्धव ठाकरे......**

राज्याच्या गृहखात्याचा कारभार ज्या मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडे आहे, त्यांना आपल्या मूळ गावात उसळलेल्या हिंसाचाराविषयी काहीच माहीत नाही, अशी टीका विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे  यांनी केली.

**<><><><><>**

राज्यात बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींच्या शोधार्थ राज्य सरकारनं स्वतःहून एक मोहीम राबवली असून, येत्या तीन महिन्यात अशा बांगलादेशींना स्थानबद्ध करण्यासाठी एक केंद्र निर्माण केलं जाईल अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली, या संदर्भातल्या लक्षवेधी सूचनेवर ते उत्तर देत होते.

बांगलादेशातून येणाऱ्या या नागरिकांपैकी काहींची कागदपत्र योग्य निघाली आहेत तर काहींची आधार कार्ड देखील बनलेली आहेत आणि ती आधार कार्ड वैध ठरलेली आहेत. अशा पद्धतीनं बनवलेली कागदपत्रं बोगस आहेत का याची तपासणी

करण्यासाठी पश्चिम बंगाल सरकार सहकार्य करत नाही हीच मोठी अडचण असल्याचं मंत्री कदम यांनी यावेळी सांगितलं. या संदर्भातली सगळी माहिती केंद्र सरकारकडे दिली असून केंद्रीय गृहमंत्री या संदर्भात गांभीर्यानं लक्ष घालत आहेत, असंही कदम यावेळी म्हणाले.

**<><><><>**

नगर विकास, सार्वजनिक बांधकाम, विधी आणि न्याय, सामाजिक न्याय, इतर मागास आणि बहुजन कल्याण, या विभागांच्या अर्थ संकल्पातल्या अनुदान मागण्या विधान सभेत आज मंजूर करण्यात आल्या. कालपासून या मागण्यावर सभागृहात चर्चा झाली होती. त्यात नाना पटोले, जयंत पाटील, अर्जुन खोतकर, छगन भुजबळ यांच्यासह इतर सदस्यांनी भाग घेतला.

**<><><><>**

राज्यातील छोट्या गुंतवणूकदारांचे पाच लाखांपर्यंतचे पैसे सुरक्षित रहावे यासाठी फसवणूक करणाऱ्या मल्टिस्टेट पतसंस्थांना देखील सहकारी बँकांप्रमाणे संरक्षण द्यावे अशी मागणी केंद्र सरकारकडे करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी प्रश्नोत्तराच्या तासांत दिली.

**बीड** जिल्ह्यात ज्ञानराधा मल्टिस्टेट पतसंस्थेकडून फसवणूक झालेल्या सहा लाख ठेवीदारांचे पैसे जप्त करण्यात आलेल्या ८० मालमत्तांचा लिलाव करून परत केले जातील. यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र ठेवीदार संरक्षण कायदा तयार केला आहे, यातून ही कारवाई करण्यात येईल असंही मुख्यमंत्री म्हणाले..

**<><><><>**

राज्य विधानपरिषदेच्या पाच जागांसाठीच्या पोटनिवडणुकीत एका अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरला आहे. त्यामुळे भाजपाचे संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी तर राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी या पाच उमेदवारांची निवड बिनविरोध होणार आहे.

<><><><><>

विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांच्या विरोधातला विरोधी पक्षांनी मांडलेला अविश्वासाचा प्रस्ताव सभापती राम शिंदे यांनी आज फेटाळून लावला. अविश्वास प्रस्ताव सादर करताना विरोधकांनी कोणतंही ठोस कारण दिलेलं नाही तसंच आवश्यक निकष पूर्ण केले नसल्यानं हा प्रस्ताव फेटाळल्याचं सभापतींनी सांगितलं.

<><><><><>

विद्यमान कायदे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मतदार ओळखपत्रं आधार कार्डाशी जोडली जाणार असल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगानं ठरवलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आज केंद्रीय गृह, संसदीय कार्य, तसंच इलेक्ट्रॉनिक्स तसंच माहिती तंत्रज्ञान खात्याचे सचिव आणि आधार प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत नवी दिल्लीत आज बैठक घेतली, त्यात हा निर्णय झाला. यासंदर्भात आधार प्राधिकरण आणि निवडणूक आयोगाच्या तांत्रिक तज्ज्ञांची चर्चा लवकरच सुरू होणार असल्याची माहिती निवडणूक आयोगानं निवेदनाद्वारे दिली आहे.

<><><><><>

शेअर बाजारात आज खरेदीचा जोर होता. दिवसाच्या सुरुवातीला ४३८ अंकांनी वर गेलेला मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स नंतर काहीसी विक्रीच्या दबावाखाली आल्याचं दिसलं, मात्र नंतर सातत्याने खरेदी झाल्यामुळं निर्देशांक १ हजार २१५ अंकांची झेप घेत ७५ हजारांची पातळी ओलांडून गेला. दिवसअखेरीस किंचित खाली घसरून कालच्या तुलनेत १ हजार १३१ अंकांची तेजी नोंदवत सेन्सेक्स ७५ हजार ३०१ वर बंद झाला.

राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी कालच्या तुलनेत ३२५ अंकांनी वधारुन २२ हजार ८३४वर बंद झाला.

**<><><><><>**

राज्य सांस्कृतिक केंद्र आणि  राज्य वस्तुसंग्रहालय मुंबईत उभे करण्यात येणार आहे, असं सांस्कृतिक कार्य मंत्री  आशिष शेलार यांनी आज विधानसभेत जाहीर केलं. राज्याच्या राजधानीत वांद्रे- कुर्ला संकुलात उभारलेल्या या वास्तूमुळे सांस्कृतिक देवाणघेवाण साध्य होईल, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कलाकारांसाठी एक व्यासपीठ उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

देशाच्या इतिहासातल्या महत्त्वाच्या घटनांप्रमाणे महाकुंभाची नोंद होईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत सांगितलं. लहानसहान सोयी सुविधांची पर्वा न करता कोट्यावधी भाविक या महामेळाव्यात सहभागी झाले होते असं ते म्हणाले. अशा उत्सवांमुळे आपल्या परंपरा, आणि वारशाचं भव्य दर्शन जगाला मिळालं  असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नागपूर शहरात काल झालेल्या हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी ५० जणांना अटक केली आहे. या प्रकरणी अफवा पसरवणाऱ्याचा शोध सुरू असून दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल, असं नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज वार्ताहर परिषदेत सांगितलं. या हिंसाचारात ५ जण जखमी झाले असून त्यातल्या दोघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हिंसाचार रोखण्यासाठी गेलेल्या पोलिसांवरही दगडफेक झाली असून तीन पोलीस उपायुक्तांसह ३३ ते ३४ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत.

**<><><><><>**

गंगाखेडचे माजी आमदार सीताराम घनदाट यांनी आज भाजपात प्रवेश केला. मुंबईतल्या भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी काल तापमानात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकण आणि विदर्भात हवामान कोरडं राहील, असं हवामान शास्त्रविभागानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**